या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २७ एप्रिल २०२४ | अंक१३८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# तुम्ही केलं तर संस्कार अन आम्ही केलं तर गद्दार? धनंजय मुंडे यांचा बारामतीतूनच शरद पवारांवर हल्लाबोल



राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्यावर जोरदार हल्ला केला. तुम्ही पुलोद सरकार स्थापन केलं, ते संस्कार अन् अजितदादांनी महायुती केली तर गद्दार? तुम्ही भाजपशी चर्चा केल्या. शिवसेनेला बाजूला ठेवण्याचा आग्रह केला. ते संस्कार आणि आम्ही सर्वांनी निर्णय घेतला तर गद्दार?, असा सवाल धनंजय मुंडे यांनी केला. ही निवडणूक भाऊबंदकीची नाही. तर देशाचा पंतप्रधान ठरवण्याची निवडणूक आहे. देशाचा पंतप्रधान कोण होणार? मोदी की इतर कोणी? याचा निर्णय करण्याची ही निवडणूक आहे, असं धनंजय मुंडे म्हणाले. बारामती लोकसभा मतदारसंघातील पुरंदर येथे राष्ट्रवादीचा युवक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात धनंजय मुंडे अनेक महत्त्वाचे गौप्यस्फोट केले. तसेच शरद पवार यांना घेरण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातून जो पूर्वीचा उस्मानाबाद आणि आताचा धाराशिव आहे. तोही दुष्काळी आहे. तिथून पश्चिम महाराष्ट्रातील बारामतीत पवारांच्या घरी मराठवाड्याची लेक दिली. तिला बाहेरची म्हटली जाते. तिला विजयी करा हे सांगण्यासाठी आलो आहे. ही निवडणूक माझ्या मराठवाड्यातील मातीसाठी प्रतिष्ठेची आहे. मराठवाड्यातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक माय माऊलीसाठी प्रतिष्ठेची आहे. घरी सून आली तर तिला लेक मानतो, याचा विसर पडत चालला आहे. या निवडणुकीत देशाचं भवितव्य ठरवायचं आहे की एका कुटुंबाचं हे ठरवायचं आहे, असं धनंजय मुंडे म्हणाले. अन् बारामतीचा विकास झाला अजितदादांचा विवाह 1985 साली झाला. सुनेत्राताई पवारांची सून म्हणून 1985 ला आल्या. त्या आधी 1978 मध्ये शरद पवारांना मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली होती. जबाबदारीने बोलतो. तुम्हीही इतिहास तपासा. 1985ला सुनेत्राताईंचे बारामतीला पाय लागले त्यानंतरच बारामतीचा विकास सुरु झाला हे विसरता कामा नये, असा दावा धनंजय मुंडे यांनी केला.

# पंकजाताई मुंडेंना माळी समाजाचे मतदान न देण्यासाठी ना.छगन भुजबळ यांची फुस.?

**माजलगाव.प्रतिनिधी-** बीड लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे आणि महायुतीच्या उमेदवारी पंकजाताई मुंडे यांच्यात लढत होईल असे समजल्यामुळे ना.छगन भुजबळ यांच्या बीड येथील ओबीसी एल्गार महासभेला पंकजाताई ,ना.धनंजय मुंडे उपस्थित राहिले नव्हते त्यामुळे ना.भुजबळ यांच्या इगोला धक्का बसला होता. त्यातच ना.भुजबळ यांना महायुती कडून नाशिक ची उमेदवारी जवळपास निश्चित झाल्याची कुणकुण पंकजाताई मुंडे यांना लागली होती पण हे पंकजा मुंडेंना कदाचीत पचणी न पडल्याने त्यांनी दिल्ली कडे तक्रार केली होती. हा सर्व राजकिय धुर्तपणा भुजबळ यांनी ओळखुन बीड जिल्ह्यातील माळी समाजाचे मतदान पंकजाताई मुंडे यांना भेटु नाही त्यामुळे माळी समाजाच्या तरुणांना विरोधात उमेदवारी दाखल करण्याची फुस लावल्याने माळी समाजाच्या जवळपास चार जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यात विशेष म्हणजे भुजबळ यांचे बीड जिल्ह्यातील समता परीषद चे सुभाष राऊत यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत अशी माहिती त्यांच्याच निकटवर्तीयां कडून मिळाली आहे. त्या उमेदवारां सोबत सविस्तर विचार विनिमय झाल्या नंतरच

## भुजबळ, सुभाष राऊत यांचे डबल कॉर्सिंग.?

बीड मध्ये पंकजाताई मुंडे यांना मिळणारी माळी समाजाच्या मतांची विभागणी करता येईल आणि त्यातील काही मते बजरंग सोनवणे यांना पण न मिळता वंचीत आघाडीच्या अशोक हिंगे मिळतील आणि बजरंग सोनवणे यांच्या पथ्थावर पाडण्याची डबल कॉस्क्रींग पोलिटिकल डिप्लोमेसी ना.भुजबळांच्या जवळीकेचा फायदा सुभाष राऊत यांनी घेतला आहे. अशा प्रतिक्रिया माजलगाव विधानसभा मतदार संघातील राजकिय वर्तुळात व्यक्त होत आहेत.

## बजरंग बप्पा सोनवणे यांना किल्ले धारुर शहरातून प्रचंड मताधिक्याने निवडून देणार



किल्ले धारूर | प्रतिनिधी साधी राहणीमान, उच्च विचारसरणी आणि प्रत्येक व्यक्ती शी जोडलेली नाळ ह्या मुळे सर्वांना परिचित असणारे बजरंग बप्पा सोनवणे यांना ऐतिहासिक किल्ले धारूर शहरातून बहुमत देऊन विजयाचा गुलाल किल्ले धारूर मधून लावण्याचा निर्धार सामाजिक कार्यकर्ते नाथ प्रतिष्ठान चे अध्यक्ष रोहित फावडे यांनी केला. महाविकास आघाडी चे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना सर्व सामान्य बहुजन जनतेने त्यांना निवडून देण्यासाठी हि निवडणुक जनतेने हाती घेतली आहे. बजरंग बप्पा सोनवणे यांचा दांडगा संपर्क आजी - माजी पदाधिकारी कार्यकर्ते, युवक, युवती ज्येष्ठ नागरिक तसेच महिला न मध्ये बजरंग बप्पा च्या नावांची चर्चा मोठया प्रमाणात होतेय बजरंग बप्पा सोनवणे हे नेहमीच जनतेच्या संपर्कात असल्याने त्यांना मतदान रुपी विकासाची साथ हि जनता नक्कीच देईल. गेल्या दहा वर्षा पासून रखडलेला विकास हा बजरंग बप्पा सोनवणे हे प्रत्येक गावागावात पोहचवितील हा विश्वास आहे.

# आ.सोळंके,माजी आ.देशमुख यांच्या समोर मराठा समाजा कडून आरक्षणासाठी घोषाणा बाजी.

**माजलगाव प्रतिनिधी**

माजलगाव._ मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी भाजप-महायुती सरकार कडून विधायक निर्णय घेतला नाही त्यामुळे मराठा समाज भाजप-महायुती सरकारच्या वादग्रस्त निर्णयामुळे त्यांच्या विरोधात आहे हे चित्र दिसून येत आहे. याचाच परिणाम म्हणुन बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी माजलगाव मतदार संघातील लवुळ-२ मध्ये आयोजित प्रचार सभेसाठी नाही केवळ बैठकीत चर्चा करण्यासाठी आलेल्या आ.प्रकाश सोळंके व माजी आमदार रोहिदास देशमुख (आर.टी.) यांची प्रचाराची बैठक संपल्या नंतर मराठा समाजाच्या तळागाळातील तरुणांनी आरक्षणा बाबतीत प्रंचड घोषाणा बाजी केली. यावर दोघांनीही त्या तरुणां सोबत काहिच चर्चा न करता पुढिल प्रचारासाठी मार्गस्थ झाल्याचे सांगितले जात आहे. तर यामुळे पंकजाताई मुंडे यांना लोकसभेची निवडणूक खडतर असल्याची चर्चा माजलगाव मतदार संघातील राजकिय गोटात होत आहे.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान मार्फत लिंबागणेश पंचक्रोशीतील भाविक श्रीक्षेत्र द्वारका धाम तिर्थयात्रेला रवाना

**लिंबागणेश**--:- बीड तालुक्यातील श्रीगुरू ईश्वर बाबा भारती यांच्या पावनभुमीत वास्तव्य असलेल्या बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान यांच्या वतीने मठाधिपती,ह.भ.प.महादेव भारती महाराज, मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेल्या श्रीक्षेत्र द्वारका धाम (गुजरात) तिर्थयात्रेसाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील बेलगाव, लिंबागणेश,पिंपरनई, पोखरी,महाजनवाडी,मसेवाडी, मुळुक,सोमनाथवाडी,भाळवणी,वाघिरा, मेंगडेवाडी,देव-याची वाडी,महेंद्रवाडी,मान्याचा वाडा, रामनगर, तुकाई वस्ती येथील जवळपास ३०० भाविक भालचंद्र गणपती तसेच बेलेश्वर येथील महादेव व ईश्वरभारती यांचे दर्शन घेऊन श्रीफळ फोडून हरिनामाचा उद्घोष करत स्लिपर कोच ट्रॅव्हल द्वारे दि.२४ एप्रिल रोजी रवाना झाले आहेत. या यात्रेचे आयोजन शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनात पांडुरंग वाणी, नवनाथ शेळके, विनोद वायभट,बंडु जाधव,आजिनाथ सांगळे,भागवत कदम यांनी केले असून तिर्थयात्रेसाठी जाणा-या भाविकांना निरोप देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आलेल्या नातेवाईक, शुभचिंतकांचे अश्रू अनावर झाल्याने वातावरण भावुक झाले होते.एकुण १२ दिवसांच्या तिर्थयात्रेच्या प्रवास दरम्यान महाराष्ट्रातील नाशिक येथील त्र्यंबकेश्वर,वणी येथील सप्तश्रृंगी गड, गुजरातस्थित निळ कंठेश्वर ,चौटीला,विरपुर,जुनागड, गिरनार,सोरटी सोमनाथ, पोरबंदर,मुळद्वारका,हर्षदमाता,द्वारकाधाम,बेटद्वारका,सिद्धपुर मातृगया,गांधीनगर, सरदार सरोवर, निळकंठ धाम, महाराष्ट्रातील वेरूळ, कैलास लेणी, बौद्ध लेणी, भद्रा मारुती,पैठण, आदि धार्मिक, ऐतिहासिक, प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन करण्यात येणार आहे.

## सांस्कृतिक एकात्मता टिकण्याचे कारण तिर्थक्षेत्र आणि तिर्थयात्रः- शांतीब्रम्ह तुकाराम महाराज

जगातील प्रत्येक धर्मानुसार पृथ्वीवरील विशिष्ट स्थाने पवित्र मानली जातात या पवित्र स्थानांना तिर्थक्षेत्रे म्हटले जाते. हिंदु धर्मात आणि संस्कृतीत तिर्थक्षेत्र व तिर्थयात्रा यांना अन्यसाधारण महत्व असुन तिर्थविवेचनात अनेक दृष्टीकोनातून मांडलेले आहे.भारतीय समाजात सांस्कृतिक एकात्मता टिकण्याचे प्रमुख कारण तिर्थक्षेत्र आणि तिर्थयात्रा म्हणता येईल.

संपादकीय

# मॉर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीज!

अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले. अशी ही ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार- यांच्या या लेखात जरूर वाचा... संपादक.

अमेरिकेच्या सरकारने या शोधाचे हक्क विकत घेण्यास नकार दिल्यावर मॉर्स यांनी स्वतःची कंपनी स्थापन केली. तारायंत्राचा प्रसार लवकरच झपाट्याने वाढला व बहुतेक देशांनी त्याचा वापर करण्यास सुरुवात केली. तथापि लगेचच मॉर्स यांच्यावर त्यांचे भागीदार व प्रतिस्पर्धी संशोधक यांनी शोधाच्या अधिकाराबाबत दावे लावले. अतिशय खर्चिक न्यायालयीन खटल्यांचा दीर्घ मालिकेनंतर इ.स.१८५४ साली अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने मॉर्स यांचा एकस्व अधिकार मान्य केला. अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यांवर तारायंत्र संदेशवहन जसजसे वाढत गेले, तसतशी मॉर्स यांची कीर्ती व संपत्तीही वाढत गेली. वृद्धापकाळात त्यांनी परोपकाराच्या उदात्त हेतूने ते स्वतः संस्थापक व विश्वस्त असलेल्या व्हॅसर कॉलेजला, त्यांच्या येल कॉलेज या मातृसंस्थेला, धार्मिक संस्थांना व संघटनांना तसेच गरीब कलाकारांना सढळपणे आर्थिक मदत केली. त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ त्यांना अनेक बहुमान मिळाले. मॉर्स यांच्या स्वतःच्या आयुष्यातच तारायंत्रामुळे जगाचे स्वरूप कितीतरी बदलले.

मॉर्स- मोर्स सॅम्युअल फिन्ली ब्रीझ हे अमेरिकन चित्रकार व विद्युत चुंबकीय तारायंत्राचे जनक होत. मॉर्स यांचा जन्म दि.२७ एप्रिल १७७१ रोजी चार्ल्सटाऊन- मॅसॅचूसेट्स येथे झाला. त्यांचे शिक्षण अँडोव्हर येथील फिलिप्स ॲकॅडमीत व पुढे येल कॉलेज येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्याकाळी फारसे आकलन न झालेल्या विद्युत या विषयावरील व्याख्यानामुळे त्यांना गोडी निर्माण झाली. त्याच वेळी त्यांना लघू व्यक्तिचित्रे काढण्याचा छंद जडला. तथापि त्यांच्या वडिलांना त्यांचा हा छंद पसंत नव्हता. सन १८१०मध्ये पदवी संपादन केल्यावर त्यांनी बॉस्टन येथील एका ग्रंथ प्रकाशकाकडे कारकुनाची नोकरी पत्करली. त्या काळचे प्रख्यात अमेरिकन चित्रकार वॉशिंग्टन ऑल्स्टन व गिल्बर्ट स्टूअर्ट यांनी मॉर्स यांच्या चित्रकलेच्या व्यासंगाला प्रोत्साहन दिले. सन १८११ साली ऑल्स्टन यांचे विद्यार्थी म्हणून ते इंग्लंडला चित्रकलेच्या अभ्यासासाठी गेले. तेथील त्या कलेच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक शैलीचा- दंतकथा व ऐतिहासिक घटना यांच्या अद्भूत चित्रणाचा त्यांनी स्वीकार केला. तथापि १८१५ मध्ये ते अमेरिकेला परतले तेव्हा अमेरिकन लोकांना त्यांच्या ऐतिहासिक चित्रांत रस नाही, असे त्यांना दिसून आले. त्यामुळे नाइलाजाने त्यांना अर्थार्जनासाठी व्यक्तिचित्रे रंगविण्याचा व्यवसाय पुन्हा पत्करावा लागला. त्यांनी न्यू इंग्लंड, न्यूयॉर्क व द.कॅरोलायना या राज्यांत 'फिरते चित्रकार' म्हणून सुरुवात केली. इ.स. १८२५नंतर न्यूयॉर्क शहरात स्थायिक झाल्यावर त्यांनी काही अप्रतिम व्यक्तिचित्रे रंगवली. त्यांतील मार्क्विस दी लाफायेत यांची दोन व्यक्तिचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत.

इ.स.१८१७मध्ये त्यांनी आपले धाकटे बंधू सिडनी एडवर्ड्स मॉर्स यांच्या समवेत पंपासंबंधीची तीन एकस्वे- पेटंटे मिळविली होती. संगमरवरावर कोरीव काम करण्याचे एक यंत्र त्यांनी सन १८२३मध्ये विकसित केले.

# गाडी सावकाश चालवू: गावी सुखरूप पोहचू!

(ओव्हर टेक विशेष.)

कारण "हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून "सदैव सैनिका पुढेच जायचे!" या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. ही मार्गदर्शक जाणिव जागृती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक.

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण "हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून "सदैव सैनिका पुढेच जायचे!" या तोऱ्यात तो मिरवत फिरतो. किंवा नुसतीच त्याला मिरवायचे असते की आपण किती कार्यतत्पर आहोत. आपली कामाची उरक लोकांच्या डोळ्यांत त्वरेने भरण्याची घाई त्याला झालेली असते. जशी आपल्याकडे झाडीबोलीतील एक म्हण प्रसिद्ध आहे तशी-

"येलपाडीचे (मिजासखोर स्त्रीचे) आले डोळे|
खाटले ठेवून खाल्या लोळे||"

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. "मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली?" म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्सना यात काहीच कशी लाज-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, "अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो." असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोध शोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चिंत! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

**.श्री एन. के. कुमार, गुरूजी.**
**(मराठी साहित्यिक विदर्भ प्रदेश)**

# ज्येष्ठ व्हा मात्र वृद्ध होऊ नका -डॉ.दीपा क्षीरसागर

# बीड येथील सौ.के.एस.के.महाविद्यालयात सेवानिवृत्त गौरव सोहळा

**बीड (प्रतिनिधी)**

दि.२६ : सेवेतून निवृत्त होणाऱ्यांनी जेष्ठ व्हावे मात्र वृध्द होऊ नये, असे उदगार डॉ.दीपा क्षीरसागर यांनी सौ.के. एस.के.महाविद्यालयात झालेल्या सेवानिवृत्त गौरव सोहळ्यात केले. सौ.के. एस.के.महाविद्यालय बीड येथे गृह शास्त्र विभाग प्रमुख डॉ.खांदाट माया ह्या आपल्या ३७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्याबद्दल गुरुवारी (दि.२५) सौ.के. एस.के. महाविद्यालयात सेवानिवृत्तीचा सेवा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, सहसचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, अध्यक्ष प्रा. किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, सत्कारमूर्ती खांदाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर उपप्रचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर पी.जी.विभाग प्रमुख डॉ. सतीश माउलगे, कनिष्ठ महाविद्यालय उप प्राचार्य डॉ. नारायण काकडे पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. खंदाट मॅडम यांच्या विषयीचे अनुभव प्रा. चौरे मॅडम प्रा. डॉ. गुळवे मॅडम यांनी सांगितले तसेच खांदाठ मॅडम यांच्या मुलींनी देखील आपल्या आईने दिलेले संस्कार यांची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य बोलताना म्हणाले की, खांदाट यांची कामकरण्याची पद्धत खूप छान होती त्यांनी एखादे काम हातात घेतले की, ते पूर्ण होईपर्यंत ते शांत बसत नव्हत्या, त्यामुळे त्यांचे काम व्यवस्थित व वेळच्या आत पूर्ण व्हायचे. त्या आपल्या विषयासाठी खूप मेहनत करायच्या. सत्कारमूर्ती डॉ.खांदाट ह्या आपला अनुभव व्यक्त करताना म्हणाल्या की, मला आई -वडिलांनीच शिक्षणाचे संस्कार दिले. आज इथपर्यंत पोहोचले ते त्यांचेच उपकार आहे. तसेच, संस्था कर्मचाऱ्यांच्या सुख दुःखात सहभागी झाल्यामुळे त्यांची ऊर्जा वाढते. माझी सौ. के. के.एस. महाविद्यालयात गृहशास्त्र विषयाच्या प्राध्यापक म्हणून ओळख झाली. माझ्या विचाराला, मताला, कार्याला साथ दिली. सुरुवातीच्या काळात म्हणजे ३७ वर्षांपूर्वीचा काळ व आजचा काळ खूप बदलला आहे. याची मी साक्षीदार आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. विद्यापीठात माझ्या विषयाची (गृहशास्त्र) चेअरमन म्हणून काम पाहिले. महाविद्यालयात सर्वांचे सहकार्य लाभले. सर्वांनी मदत केली. सौ.के.एस.के. महाविद्यालयात काम करताना खूप चांगले अनुभव आले. माझे विद्यार्थी प्राध्यापक ते प्राचार्य पदापर्यंत पोहोचले आहेत याचे खूप समाधान वाटत आहे. महाविद्यालयात सौजन्याने वागणे हा माझा स्वभाव होता. यावेळी नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. किशोर काळे बोलताना म्हणाले की, प्रामाणिकपणे केलेला कामाचा फायदा आयुष्यात पुढे होतो. संसाराच्या गाड्यांमध्ये चार चाक असतात त्याचे दुसरे दोन चाक म्हणजेच महिला असतात. नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष तथा माजी प्राचार्या डॉ. दीपा क्षीरसागर म्हणाल्या की, प्रेमाचा आपुलकीचा आदर्श कसा असतो तो आपण दाखवला पाहिजे. महाविद्यालयात डॉ.खांदाट माया यांनी प्रेमाने, आपुलकीने ३७ वर्षे काम केले. विद्यार्थ्यांप्रती आपुलकीचा आदर्श कसा असतो तो आपण दाखवला.विद्यार्थ्याप्रती, विषयाप्रती खूप तळमळ आहे. यासाठी केलेला अट्टाहास शेवट गोड व्हावा. आपण फक्त शैक्षणिक कामातून निवृत्त होत आहात. त्यामुळे जेष्ठ व्हा वृद्ध नाही. मोठ्याने मोठेपणाचा दाखला



देत म्हणाल्या की, आयुष्य हे धार असते जीवन हे चालूच असते. ठराविक वेळ आपले वय आपल्यातील आठवणी ठेवते. फक्त प्रेम ही गोष्ट आई-वडिलांकडून फुकट मिळते पण जगात बाकी सर्व गोष्टीसाठी पैसा मोजावा लागतो. काही माणसं पाण्यासारखे प्रांजळ असतात, स्वतःसाठी जगून प्रत्यक्ष करतो तोच मोठा होतो. नाहीतर नाव तर भिंतीवर लिहिलेले असतात. डॉ. दीपा क्षीरसागर यांनी संस्थेच्यावतीने डॉ. खांदाट यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचलन डॉ. अनिता शिंदे यांनी केले तर आभार प्रा.जाधव एम. बी.यांनी मानले. या कार्यक्रमात डॉ. देशमाने व्ही. टी., डॉ.गुट्टे सुधाकर, डॉ. नाईकवाडे, डॉ. गुळवे, डॉ.गर्जे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, डॉ.खांदाट यांच्या आप्तेष्ट बहुसंख्येने उपस्थित होते.

# ३९ बीड लोकसभा मतदारसंघात ५५ वैध उमेदवार : छाननी अंती १९ उमेदवार बाद

बीड, दि 26 : 39 बीड लोकसभा मतदारसंघात आज छाननी चा दिवस असून 55 उमेदवार वैध घोषित झालेली आहेत तर छाननी अंती 19 उमेदवार बाद ठरली आहेत. 18 ते 25 एप्रिल सकाळी 11 ते 3 वाजेपर्यंत नामनिर्देशन अर्ज वाटपाची तसेच सादर करण्याची वेळ होती. या कालावधी दरम्यान एकूण 74 उमेदवारांनी 99 अर्ज दाखल केले होते. आज छाननी अंती 19 उमेदवार बाद ठरले असून 55 उमेदवार वैध नामनिर्दिष्ट उमेदवारांची नावे खालील प्रमाणे आहेत. पंकजा गोपीनाथ मुंडे, भारतीय जनता पक्ष, बजरंग मनोहर सोनवणे, नॅशनॅलिस्ट कॉँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, सिद्धार्थ राजेंद्र टाकणकर, बहुजन समाज पक्ष, अशोक भागोजी थोरात, बहुजन महापार्टी, अशोक सुखदेव हिंगे, वंचित बहुजन आघाडी, अंकुश रामा खोटे, भारतीय जवान किसान पार्टी, करुणा मुंडे, स्वराज्य शक्ती सेना, चंद्रकांत कुमार हजारे, महाराष्ट्र विकास आघाडी, जावेद सलीम सय्यद, टिपू सुलतान पार्टी, ताटे महेंद्र अशोक, आंबेडकरिस्ट रिपब्लिकन पार्टी, भीमराव जगन्नाथ दळे, अखिल भारतीय परिवार पार्टी, माणिक बन्सी आदमाने, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, मुक्ता भिमराव दळे, दलित शोषित पिछडा वर्ग अधिकार दल, रविकांत अंबादास राठोड, समनक जनता पार्टी, शरद बहिनाजी कांबळे, ऑल इंडिया नॅशनल रक्षा सेना, शेषेराव चोखोबा वीर, प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी, अपक्ष वैध उमेदवार उदयभान नवनाथ राठोड , कस्पटे गणेश व्यंकटराव, गणेश नवनाथराव करांडे, गणेश भाऊसाहेब कोळेकर, गफ्फार खान जब्बार खान पठाण, गोकुळ बापूराव सवासे, गंगाधर सिताराम काळकुटे, जावेद सिकंदर मोमीन, तुकाराम विठोबा उगले, दत्ता सुदाम गायकवाड, नाजेम खान जब्बार खान पठाण, पाराजी तुळशीराम आगे, प्रकाश भगवानराव सोळंके, भास्कर किसन शिंदे, भास्कर बन्सी खांडे, मुबीन जुबेरी झहीर उल अफ्राक, मुस्तफा मैनोदिन शेख, राजेंद्र अच्युतराव होके, रासवे संतोष उत्तम, रेहमान बाहोद्दीन सय्यद, लक्ष्मीबाई बाजीराव मोरे, वचिष्ठ उद्धव कुटे, वसीम शे. सलीम शेख, विनायक तुकाराम गडदे, शितल शिवाजी धोंडरे, शेख एजाज शेख उमर, शेख तौसिफ अब्दुल सत्तार, शेख याशेद शेख तय्यब, श्रीराम विठ्ठलराव खळगे, सतीश पद्माकर कापसे, संमशेरखाँ साहेबखाँ पठाण, सय्यद मिनहाज अली, सलाउद्दीन खान पठाण, सलीम अल्लाबक्ष सय्यद, सादेक इब्राहिम शेख, सादेक हुसेन मोहम्मद, सारिका बजरंग सोनवणे, सुलेमान खैरोद्दिन महमद, हिदायत सादेख अली सय्यद. अशी अपक्ष उमेदवारांची नावे आहेत. 29 एप्रिल 2024 ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. 13 मे 2024 रोजी मतदान होणार आहे. तर 4 जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता 6 जूनपर्यंत राहील.

# संविधान बदलण्याचे जाहीर वक्तव्य करणाऱ्या भाजपावर संविधान रक्षकांनी मतदानाद्वारे हल्ला करावा-ॲड.सिद्धार्थ शिंदे


वादळवार्ता/बीडआर.एस.एस. आणि भाजपाचा जन्मच मनुस्मृती आणण्यासाठी आणि भारतीय संविधान बदलण्यासाठी झालेला आहे. २०१४ च्या पुर्वी हा छुपा अंजेंडा होता. भाजपा सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या पोटातील शब्द जाहीरपणे तोंडात येत आहेत अशी माहिती पत्रकाद्वारे संविधान रक्षकचे संयोजक ॲड.सिद्धार्थ शिंदे यांनी दिली आहे. प्रसिद्धी पत्रकामध्ये असे म्हटले आहे की, भाजपा सत्तेवर आल्यानंतर जाहीरपणे संविधान बदलण्याची भाषा करु लागलेले आहेत त्यामध्ये भाजपा खासदार अनंतकुमार हेगडे यांनी जाहीर सभेत म्हटले होते की, भाजपा संविधान बदलण्यासाठी सत्तेवर आलेली आहे. सहा महिन्यापुर्वी नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागार समितीची अध्यक्ष-बिबेक देबरॉय याने एक लेख लिहिला आणि ब्रिटीशकालीन भारतीय संविधान बदलण्याची आवश्यकता आहे असे नमुद करण्याचा लेख लिहिला आहे. केशवानंद भारती वि.केंद्र सरकार हा सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याप्रमाणे संविधानाची चौकट बदलता येत नाही त्यामुळे नवीन संविधान तयार केले पाहिजे असे संकेत राज्यसभेत खासदार रंजन गोगई यांनी केलेले आहे. दि. १३ एप्रिल २०२४ रोजी भाजपा खासदार लल्लूसिंग यांनी त्यांच्या लोकसभेचा प्रचार करत असतांना भाजपाला ४०० पारची आवश्यकता २/३ बहूमतासाठी आवश्यक आहे त्यामुळे भारतीय संविधान बदलणे सोपे होईल त्यासाठी ४०० खासदार निवडून आणा असे जाहीर आवाहनच खासदार लल्लूसिंग यांनी केलेले आहे. भारतीय सैनिक ज्याप्रमाणे आपला प्राण तळहातावर घेवून सरहद्दीचे आणि देशाचे संरक्षण करतो त्याप्रमाणे सर्व संविधान रक्षक आणि भीम सैनिकांनी मतदानाद्वारे हल्ला करुन भाजपाचा पराभव आणि इंडिया आघाडीचा विजय भरघोस मतांनी करावा असे आवाहन संविधान रक्षकचे संयोजक ॲड.सिद्धार्थ शिंदे, बीड यांनी केलेले आहे.

# पालकमंत्र्यांचा बहुरंगीपणा जिल्ह्याला नव्हे, उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे प्रतिउत्तर

**वादळवार्ता/धारूर**


बहुरंगी कोण आहेत ? हे सांगण्याची गरज नसून आपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांचा बहुरंगीपणा जिल्ह्यालाच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. असे प्रतिउत्तर राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांनी केलेल्या टीकेला दिले.

भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर बीड येथे झालेल्या जाहीर सभेत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्यावर वैयक्तिक टीका केली होती. गुरुवारी धारूर तालुक्यात प्रचारादरम्यान फिरत असताना बजरंग बाप्पा सोनवणे यांनी पालकमंत्र्यांनी केलेल्या वैयक्तिक टिकेबद्दल त्यांचा समाचार घेताना म्हटले की, आपल्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्याचा बहुरंगीपणा हा फक्त बीड जिल्ह्यालाच माहीत नव्हे तर अख्खा महाराष्ट्राला माहित आहे. ते किती बहुरंगी आहेत ? हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही अशी चपराक त्यांनी लगवली आहे. धारूर तालुक्यात अनेक गावांना भेटी देत बजरंग सोनवणे यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी पक्षाचे व इंडिया आघाडीतील मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# ई डी सी बी आय चा धाक दाखवणा-या भाजप सरकारला हद्दपार करा माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

बीड-बीड देशामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या जातीजातीमध्ये फूट पाडणाऱ्या देशाचे नाव उंचवणाऱ्या व शिक्षण आरोग्य पाणी विद्युत यामध्ये क्रांती करणाऱ्या करणाऱ्या नेत्यांना आम आदमी पार्टीचे सर्व सर्व मा अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री दिल्ली सरकार मा. मनीष सिसोदिया उपमुख्यमंत्री दिल्ली सरकार सत्येंद्र जैन आरोग्य मंत्री दिल्ली सरकार मा. संजय सिंग खासदार यासारख्या आम आदमी पार्टीच्या नेत्यांना खोटे आरोप करून ईडी सीबीआयच्या मार्फत धाक दाखवून बीजेपीच्या वॉशिंग पावडर मध्ये या नाहीतर जेलमध्ये जा अशी परिस्थिती निर्माण करून दहशत पसरण्याचे काम करत आहे ज्या नेत्यांनी संपूर्ण जगामध्ये शिक्षण आरोग्य पाणी विद्युत अशा क्षेत्रांमध्ये क्रांती केली पण त्यांना जेलमध्ये टाकले याचा हिसाब करण्यासाठी भारतीय जनता पार्टीला धडा शिकवण्यासाठी येणाऱ्या 13 तारखेला लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीचे लोकप्रिय उमेदवार मा .बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे असे आव्हान आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे करत आहे



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शनिवार २७ एप्रिल २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



डॉक्टर ज्ञानेश्वर गिलबिले यांचा वाढदिवस साजरा करताना संघर्ष लढा ग्रुप माजलगाव

# केंद्र सरकारचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी पंकजाताईंना निवडून द्या-डॉ.योगेश क्षीरसागर

## नाळवंडी सर्कलमधील कॉर्नर बैठकीत डॉ.योगेश क्षीरसागरांनी केले आवाहन

बीड (प्रतिनिधी)दि.२६ : आपल्या मागण्या केंद्रात मांडून पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने बीड तालुक्यातील नाळवंडी येथे शुक्रवारी (दि.२६) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिकांशी बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले की, देश कोण सुरक्षित ठेवू शकतो याचा विचार करून मतदान करा पुढच्या पाच वर्षात देश महासत्ता बनेल. केंद्र सरकारच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात हायवे रस्त्यांची कामे झाली. मागील दहा वर्षात देशासह बीड जिल्ह्यात देखील अनेक विकासाची कामे झाली आहेत. यापुढे देखील बीड जिल्ह्याच्या विकासासाठी मोठा निधी आणायचा असेल तर महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून द्यावी लागेल त्यांच्याच माध्यमातून विकास होऊ शकतो. पंकजाताई राज्याच्या मंत्री असताना या नाळवंडी सर्कलमध्ये देखील विविध विकास कामे झाली आहेत. विरोधक आता निवडणुकीत आरक्षणाचा मुद्दा समोर आणतील. आम्ही सर्वसामान्यांसाठी कायमच राष्ट्रीय उतरून काम केले आहे. सर्व समाजाच्या न्याय हक्कासाठी काम करतो. बीड ते नाळवंडी रस्त्याच्या कामासाठी उद्योग मंत्री ना.उदय सामंत यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. आचार संहिता संपताच बीड ते नाळवंडी रस्ता कामाला देखील मंजुरी मिळणार आहे. त्यामुळे कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता जातीपातीचे राजकारण न करता आपल्या मागण्या केंद्रात मांडून पूर्ण करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मतदान करा व आपल्या भागातील विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी



आणण्यासाठी पंकजाताईंना संसदेत पाठवा. आपल्या भागातील विकास कामे करून घेण्यासाठी आमच्यावर विश्वास ठेवून मतदान करावे असे आवाहन नाळवंडी येथील कॉर्नर बैठकीत उपस्थित नागरिक आणि महिलांशी संवाद साधताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. तसेच नाळवंडी सर्कलच्या प्रत्येक घराघरात जाऊन प्रचार करून पंकजाताईंना मतदान करण्याची विनंती करण्याचे कार्यकर्त्यांना डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आवाहन केले. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मतदान करून विजयी करू असा शब्द गावकऱ्यांनी यावेळी दिला. यावेळी सरपंच राजेंद्र राऊत, मा.पंचायत समिती सदस्य सुधीर काकडे, मा.उपसभापती अरुण लांडे, सरपंच संदीप डावकर, गणेश राऊत, मंगल म्हेत्रे, संगीता वाघमारे, सुमंत राऊत, भास्कर शेळके, भगवान काळे, हनुमंत बांडे, परमेश्वर शिंदे, बंडू म्हेत्रे, शंकर लचके, रितेश लांडे, गणेश काळे, संजय काळे, लहू राऊत, संतोष राऊत, ज्ञानेश्वर राऊत, साजेद जहागीरदार, माजेद कुरेशी, मिलिंद ठोकळ, बाळू आमटे यांच्यासह आदी उपस्थित होते.

### बहुरंगी उमेदवाराने निष्क्रिय आमदाराला कॅप्टन केलंय

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी बीड मध्ये झालेल्या सभेत विरोधी उमेदवाराला बहुरंगी उमेदवार म्हणाले होते. त्याच बहुरंगी उमेदवाराने त्यांच्या निष्क्रिय आमदाराला बीड जिल्ह्याचे कॅप्टन केलंय. त्याच कॅप्टनला मागील चार वर्षात सगळी टीम सोडून गेली आहे. या आमदाराने मागील साडे चार वर्षात काय दिवे लावले असा टोला डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आ.संदीप क्षीरसागर यांना लगावला.

### जात पात न बघता गुणवत्तेवर मतदान करा - अ‍ॅड. राजेंद्र राऊत

नाळवंडी गावचे सरपंच अ‍ॅड. राजेंद्र राऊत प्रास्ताविक भाषणात बोलताना म्हणाले की, विरोधकांकडून जातीपातीचे विष पेरले जाते सर्व समाज बांधवांना आवाहन करतो की जातीचे राजकारण करणाऱ्याला थारा देऊ नका पंकजा मुंडे यांना मतदान करून संसदेत पाठवा पंकजाताई मुंडे यांना जिल्ह्याचा विकास करण्यासाठी, ऊसतोड कामगारांचा जिल्हा ही ओळख पुसून टाकण्यासाठी मंत्री म्हणून पाठवा. लोकसभा निवडणुकीत पंकजाताईंची डॉ. योगेश भैय्यांच्या माध्यमातून ताकद वाढवू त्यांना लीड मिळवून देऊ. यावेळी गुणवत्तेवर मतदान करा. पंकजाताईंना निवडून दिल्यावर नक्कीच जिल्ह्याचा विकास आणि नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि पंकजाताई मुंडे यांनी बीड विधानसभेचे जिम्मेदारी डॉक्टर योगेश क्षीरसागर यांच्यावर उपयोगी आहे त्यामुळे सर्व गावकऱ्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांचे मागे उभे राहून पंकजा ताईंना मोठ्या संख्येने मतदान करावे असे आवाहन अ‍ॅड.राजेंद्र राऊत यांनी केले.


### विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळेच जाती पातीचे राजकारण-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी आपल्या भाषणात म्हणाल्या की, मागील दहा वर्षांपूर्वी देशात अनेक ठिकाणी आतंकवादी हल्ले व्हायचे. मात्र महायुतीचे सरकार देशात आल्यापासून पुलवामाचा हल्ला सोडता कुठलाही आतंकी हल्ला झालेला नाही. विरोधकांकडून वारंवार सांगितले जात आहे की, देशात महायुतीचे सरकार आल्यास संविधान बदलले जाऊ शकते हा चुकीचा गैरसमज पसरविला जात आहे. मात्र घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान हे कोणीच बदलू शकत नाही. महायुती कडून सर्वच ठिकाणी चांगले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत. बीड लोकसभा निवडणुकीत देखील पंकजाताई मुंडे यांच्या रूपाने एक राज्याच्या मंत्रिमंडळात काम केलेला अनुभवी आणि मुरब्बी चेहरा दिला आहे. विकासाचे व्हिजन असलेले उमेदवार महायुतीने दिले आहेत. सध्या विरोधकांकडे विकासाचे मुद्देच नाहीत. त्यांच्याकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळे जाती पातीचे राजकारण केले जात आहे. येणाऱ्या निवडणुकीत मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदान करावे. काही महिन्यांपूर्वी आम्ही देखील विकासाच्या मुद्द्यावर आणि बीड मतदारसंघात विकासाची कामे मोठ्याप्रमाणात व्हावीत म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजित दादा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत पक्षात प्रवेश केला. अजित दादा यांनी कसलेही पद नसलेल्या डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीवरून बीड मतदार संघात विकासाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला. त्यामुळेच विविध विकास कामे पूर्ण झाली आहेत.नेता कोणत्या जातीचा आहे हे न बघता त्यांचे काम कसे आहे हे बघा. बीड जिल्हा हा आदर्श जिल्हा आहे. जात पात बघू नका विकासाच्या मुद्द्यावर मतदान करा. बीड जिल्ह्यात पंकजाताई यांच्या माध्यमातून महिलांसाठी उद्योगधंदे, बचत गट यासाठी येणाऱ्या काळात मोठा निधी उपलब्ध होईल. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.

# अबॅकस सर्वोत्कृष्ट विद्यार्थी राजवीर राहुल वाईकर प्रथम क्रमांकाचे मास्टर अबॅकस पदक विजेता सुवर्ण मेडल

## मास्टर अबॅकस राजवीर राहुल वाईकरला प्रमाणपत्र-प्रशस्तीपत्रबहाल

( बीड प्रतिनिधी ) = शहरातील अबॅकस तथा वैदिक मॅथ आणि रुबिक क्यूब प्रशिक्षण केंद्राद्वारे अनेक विद्यार्थ्यांना बौद्धिक दृष्ट्या स्वावलंबी करण्याचे उत्कृष्ट शैक्षणिक कार्य गेल्या काही वर्षापासून सतत अविरत चालू आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास करण्याच्या उद्देशाने गणितीय पद्धतीचा तंत्राच्या द्वारे, वैदिक मॅथच्या द्वारे विद्यार्थ्यांमधील गणिता विषयाची भीती दूर करण्याचे कार्य या प्रशिक्षण केंद्रामधून श्री. डॉ. घोडके ए एस मास्टर अबॅकस तथा वैदिक मॅथ ट्रेनर यांच्याद्वारे केले जात आहे. मास्टर अबॅकस हुशार विद्यार्थि राजवीर राहुल वाईकरला अबॅकस ज्युनियर तिसऱ्या लेवल्समध्ये सर्वोत्कृष्ट प्रथम क्रमांक मिळवून यशस्वीरित्या सुवर्ण मेडल आणि सायटेशन मिळवले असून राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये सुद्धा भाग घेण्याची संधी मिळवले आहे . दिनांक 25 एप्रिल 2024 रोजी अबॅकस थर्ड ज्युनियर लेवलमध्ये सर्वोत्कृष्ट प्रथम क्रमांकाचे कम्प्लिशन प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे . राजवीर राहुल वाईकरने अबॅकस तथा वैदिक मॅथआणि रुबिक क्यूब प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रथम क्रमांकामुळे दिल्ली येथील अबॅकस असोसिएशनचे अध्यक्ष श्रीधरन एस बी, उडीसा राज्याचे अबॅकस मास्टर ट्रेनर तथा एमडी ॲरिस्टो किड्स श्री उज्वल पांडा, महाराष्ट्र राज्य स्तरावरील विदर्भ अबॅकस प्रमुख श्री अमोल विरवले, तेलंगणा तथा आंध्र प्रदेशच्या प्रमुख आय सी एम एसच्या एमडी श्रीमती वरलक्ष्मी तसेच एम एम गो यु एस ए अमेरिकाचे प्रमुख जॉर्ज स्टीफनहार्ट तथा अबॅकस प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख श्री डॉ. ए एस घोडके यांनी राजवीर राहुल वाईकरचे अभिनंदन करून उज्वल भविष्याबद्दल हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. राजवीर वायकर म्हणतो की "माझ्या अबॅकसच्या अभ्यासामुळे व्यक्तिमत्व विकास होतच असून होकारात्मक दृष्टिकोन तसेच गणिताबद्दलची भीती कमी




होत आहे आणि सहज सोप्या पद्धतीने अनेक क्लिष्ट गणित सुद्धा मी सहजरित्या सोडवत आहेत". अशाच अनेक विद्यार्थ्यांमध्ये गणिताबद्दलची भीती कमी करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे कार्य अबॅकस स्टडी केंद्राद्वारे सतत केले जात आहे. अबॅकसमध्ये पुढील वर्षांमध्ये सुद्धा अनेक विद्यार्थी यश मिळवतील हे नक्कीच आहे असे जिल्हा अबॅकस वितरक श्री डॉ. घोडके ए एस यांनी सांगितले आहे.

### झाड एक कुटुंबातील सदस्य

अस म्हणतात रोजच्या दैनंदिन जीवनात आपण नेहेमी आपल्या विविध क्षेत्रातील कामात व्यस्त असतो शिक्षण घेऊन प्रत्येकजण आपल्या नोकरी आणि व्यवसाय यांच्या शोधात असतो एकंदरीत अर्थार्जनासाठी हे सगळं काही चालू आहे अविरतपणे..... सगळेच अधिकारी होत नाहीत आपल्या पध्दतीने आपला मार्ग निवडताना दिसतात अनेकांना यशस्वी वाट सापडते अस नाही कोणी नोकरी तर कोणी मजुरी तर कोणी शेती तसेच विविध उद्योगधंद्यात अडकून पडले.... अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाने प्रगती केली मानवाला रोजगार उपलब्ध झाले परंतु माणूस ज्यांची उपकाराच्या ओझ्याखाली वाढला जगला आज त्याच निसर्गाचा आपल्या स्वार्थासाठी बळी देऊ लागला.... होत्याच नव्हत झाले आणि रोगराईच्या नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या केवळ मानवाच्या बुद्धीचा वापर चुकीच्या पद्धतीने होऊ लागला दुष्परिणाम म्हणून सुपीक जमीन आता नापीक आणि ओसाड अशी ओळख निर्माण झाली...... पहिल माणूस जंगलात त्यानंतर झोपडीतून आता मोठमोठ्या इमारतीचा भाग झाला आणि झाडांचा विनाश झाला गाव वस्ती झाडामागे लपलेली असायची आणि आता झाड हा शब्द गाव, शहर वस्तीतून हरवला.... ओथंबून वहाणाऱ्या नद्या कोरड्या झाल्या आणि शेतकऱ्यांना वेळ आली ढगांकडे बघायची... ये रे बाबा आता तरी जमिनीला भेगा पडल्या.... पाऊस रुसला पाण्यासाठी वणवण भटकंतीत मानवला जिवन जगणे मुश्किल झाले तरीदेखील त्याचे डोळे उघडले

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com